# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

- कवितेचे शीर्षक : - संगीत
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. सेजल चांदे

तो एक सूर
ते एक गीत
त्यास वाद्यांची साथ
मग होईल ते संगीत

संगीत स्पर्श कसा
जळून तार छेडी वीणा
तो हृदय स्पर्श असा
वेड लावी मज प्राणा

ताल धरे तबला
जोड देई त्यास पेटी
त्या अनोख्या चालीला
हळूच संगीत येई भेटी

वाद्यांची ती खेळी
करी मनास मोकळ
संगीत-संगीत म्हणता
नसे याहुनी काही वेगळं

डफ म्हणे खंजीरीला
हो संगीतात दंग
सोडुनिया मोह माया
राहू संगीतात संग

बोले ते संगीत
नादमय वाद्यांमधूनी
हळूच नाचता गीत
लय देई चालींमधूनी

Anahat Music Therapy

# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

हात घाली काळजाला
अन शांत करी मनाला
संतुरीचा सहवास तो
तल्लीन करी जीवाला

नादमय लय त्यात
अडकवी सुरांच्या विळख्यात
प्रसन्न होई मन मग
जणू ती मोगरी सुरूवात

रंग राग एक ताल तो
सा रे ग म सप्तसूर तो
काळरुपी एक प्रवास तो
मनाची साद असा स्वर तो

सोनचाफ्यापरी जणू गंध हा
सोडवे ना असा बंध हा
मनीचे सूर कसे ओठी दाटले
भिजूनी स्वरात चिंब नयनी साचले

सूर परी वाद्य ते स्वरांची बरसात
रुतूनी मनी भिडले खोल काळजात
हरवली जणू श्वासातली प्रीत
प्रेम, मोह, माया, लावी वेड संगीत

ना तो फक्त एक स्वर
नाही ती एक कला
संगीत सूर एक होई
बेभान नाचे टाळ, तबला

एक मार्ग असा तुही
आनंद देई संगीताचा
साधन एक तू करी
शांत गोंधळ मनीचा

एका वाद्याने गीतास असे विचारले
गीत म्हणजे काय हे त्यानेच ठरवले
म्हणूनी असावे या संगीत विश्वी

Anahat Music Therapy

# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

असे स्वर, गीत जन्मी आले

जन्मी वाद्याने केले कसे
संगीत सूर ते संपूर्ण
धन्य-धन्य ते गीत असे
झाली वाद्यही सुरी प्रसन्न

जन्मुनी गीत इतिहासरुपी जाहले
टाळ, तबल्याच्या साथीने बहरले
लाजूनी हळूच ते बासरीस म्हणाले
वाद्यांनी मज छेडूनी सप्तसूर झाले

स्पंदन छेडीता हळूच हसले
फुलले खुलूनी वाद्यवृंदी सहवासात
जीवन सारे रंगुनी गेले
हरपले जणू सप्तरंगी बंधनात

जरी येता तरी सूर येतो
जाता तरी हसूनी म्हणतो
संगीत ओठी खुलूनी बघता
त्यातूनी लय ताल डोलतो

अडकली वाट मनी संगीत सुरांची
तिथे चाहूल स्वर्ग परी सुखाची
दुःखास पुरुनी उरावे असे ते
नयनी भुरळ पाडे सुर तार्‍यांची

सुर मनी तो एक झाला
बेचैन मनी विलोम लाभला
संगीतात रुजुनी एक स्वर
धुंद मनी बेभान झाला

तो एक इतिहास होता
जिथे फक्त सूर होता
काळरूपी वाद्य नाचता
सुर एक झाला संगीता

जनाईने म्हटली ओवी

Anahat Music Therapy

‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

जात्यावर संगीताची
पान्हा फुटूनी संगीतास
सुरुवात झाली दुधाळ सुरांची

घेऊनी करी चिपळी
केला नामदेवांनी अभंग
डौलाने म्हणे चिपळी संगीता
हा जणू स्वर्ग स्पर्श ताल मृदूंग

भजनी विठ्ठलाच्या धन्य गोरा कुंभार
तल्लीन सदा विठ्ठल जपात
सारा हा पंढरी संगीत कारभार
जीवाची बेडी अडके त्याच्याच नादात

तालावरी नाचे जणू विठ्ठल सावळा
रंगूनी गेला हरी भजनात
मनी लागला हा संगीत लळा
दिसला जणू टाळ, तबल्यात

ती बासरीची धून
करी जीवन बेभान
मग हसूनी जाते मन
अन हसते देह - भान

बोटांची लय फिरुनी विणेवरी
ती हळूच मनी नाचली
होता अशी जादू
तिथे संगीत चाहूल लागली

सुर गीतास छेडीता
ते संगीतही लाजे
त्यातून नाद झळाळता
ते वाद्यवृंदही साजे

इंद्रधनू जसा तसे ते सात सूर
शोभे रस त्यात हा वीर शूर
नष्ट करूनी अहंकार
न लागे त्याचाही अंतपार

Ananat Music Therapy

# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

बोल - बोल तू संगीता
एक तुझीच मनी सूर साथ
मन एकटं एकटं जेव्हा
देई तूच एकांती हात

अजूनी काय म्हणावे संगीतास
ऐकताची लागे तयाची आस
शब्दबद्ध करुनी सोडी
अडकवी हाती सुरांची बेडी

पडे तिथे सडा
हा संगीत सुरांचा
नाद त्यातूनी डोले
हा सप्तरंगी वृंदाचा

ओढ लागता अशी मनी
ती चाहुल संगीत जूनी
एक खोलवर रुतली आस
असा तो सूर संगीत प्रवास

Anahat Music Therapy